M16/MPS202/EE/20160519

वेळ : 3 तास **गुण : 80**

विद्यार्थ्यांसाठी सूचना :

1. एम.ए. पब्लिक सर्व्हिसेसच्या द्वितीय वर्षाचे सर्व पेपर्स दीर्घोत्तरी (निबंधवजा) स्वरूपाचे आहेत.

2. यासाठी उणे गुणपद्धत लागू नाही.

मराठी पेपर

गुण : 40

1. पुढीलपैकी एका विषयावर निबंध लिहा. 10

   a) स्त्रीचे चारित्र्यरक्षण – जबाबदारी कुणाची?

   b) सहिष्णूता

   c) मना सर्वथा सत्य सांडू नका रे।

   d) माझे स्वप्नः मी सैनिक व्हावे

2. पुढील उताऱ्यावरून प्रश्नांची उत्तरे लिहा. 10

अभिजात संस्कृत साहित्याचा इतिहास

संस्कृत नाट्याची स्वतःची अशी आणखी काही वैशिष्ट्ये आहेत. संस्कृत नाट्य 'नांदी' नामक मंगलश्लोकाने सुरू होते. त्यानंतर सुत्रधार व त्याचे साहाय्यक नाट्यवस्तूचा प्रस्ताव करतात. नाट्यवस्तु अंकांमध्ये विभागलेली असते. दोन अंकांचा सांधा जुळविण्यासाठी प्रवेशक किंवा विष्कंभक यांची योजना असते. मिश्र विष्कंभकात मध्यम तसेच नीच दर्जाच्या पात्रांची योजना असते व तो नाटकाच्या प्रारंभी सुद्धा येऊ शकतो. प्रवेशकात फक्त नीच दर्जाची पात्रे असतात व तो दोन अंकांच्या मध्येच येतो. युद्धासारखे जे प्रसंग रंगमंचावर दाखवता येणे शक्य नसते, मृत्यूसारखे जे प्रसंग रंगमंचावर दाखविणे योग्य नसते, तसेच जे प्रसंग गौण असल्याने प्रत्यक्ष दाखविण्याची आवश्यकता नसते, पण कथेचे दुवे जुळविण्यासाठी त्यांचे निवेदन आवश्यक असते, असे सर्व प्रसंग प्रवेशक–विष्कंभकामध्ये निवेदनाद्वारे सांगितले जातात. नाटककाराच्या रचनाकौशल्याचे ते निकष मानले जातात. नाट्यवस्तूमध्ये स्थल, काल व क्रिया यांच्या संबंधात ऐक्य असावे अशी अपेक्षा असते. उत्तम दर्जाच्या पात्रांनी (जसे राजा, पुरोहित इ.) संस्कृतमध्ये; तर मध्यम व अधम दर्जाच्या पात्रांनी तसेच सर्व स्त्रीपात्रांनी प्राकृतमध्येच बोलावे असा दंडक आहे. कोणत्या पात्रांनी कशा रीतीने बोलावे यांचे नियम आहेत. नाट्यसंहिता गद्य व पद्य अशी संमिश्र असते; पण प्रत्येक पद्य 'गायले' जात नाही. पद्य गायचे असेल तर तशी स्पष्ट सूचना असते. 'जनान्तिकम्', 'अपवार्य', 'आत्मगतम्' वगैरे रंगसूचना संहितेमध्ये दिलेल्या असतात. वैदर्भी व गौडी या दोन्ही प्रमुख शैलींचा विषयोचित व रसानुरूप उपयोग केलेला दिसतो. नाट्याचा शेवट मुख्य पात्राने म्हटलेल्या भरतवाक्याने होतो.

संहिता व प्रयोग ही नाट्याची दोन अंगे सारख्याच तोलामोलाची असतात; किंबहुना असायला हवीत. नाट्यसंहिता हा 'काव्याचा' – अर्थात ललित वाङ्मयाचा – एक विशिष्ट बंध आहे. त्यामुळे संहिता वाङ्मयीन गुणवत्तेने संपन्न असावी अशी नाटककाराची व रसिकांची अपेक्षा असते. पण त्याचबरोबर संहितेचे प्रयोगमूल्य सुद्धा श्रेष्ठ दर्जाचे असले पाहिजे. हा समन्वय साधणे अवघड तर खरेच! संस्कृत नाट्याच्या प्रवासाचा आलेख पाहता असे लक्षात येते की, सुरूवातीच्या काळातील नाटके अधिक प्रयोगक्षम आहेत. भासाच्या बहुतेक नाटकांचे ते वैशिष्ट्यच आहे. नाट्याची भाषा व शैली साधी, सुबोध, पण त्याचबरोबर पकड घेणारी आहे. पांडित्याचा, अलंकारांचा सोस नाही. अकृत्रिम ठाशीवपणा, छोट्या वाक्यांनी बनलेले नाट्यपूर्ण संवाद, विनोदाचा ताजेपणा, साधी पद्यरचना यांमुळे नाट्यातले 'नाट्य' जिवंत राहिलेले आहे.

'संस्कृत भाषेचा विलास' म्हणून प्रसिद्ध असलेल्या कालिदासाने नाट्यामध्ये काव्याची बहार आणली; पण 'काव्याला' 'नाट्यावर' कुरघोडी करू दिली नाही. साहित्यिक गुणवत्ता व प्रयोगमूल्य यांचा सुंदर मेळ साधला. पण पुढच्या काळात हळूहळू काव्याने नाट्यावर मात केली. कवींचे पांडित्य, कृत्रिम रचनांचा हव्यास, अलंकारांचा बडेजाव, लांबलचक व अवघड पद्ये, प्रबंधवजा संवाद यांच्या माऱ्यामुळे 'नाट्य' गुदमरून गेले. या अवकळेची पदचिन्हे भट्टनारायणापासून दिसू लागतात. भवभूतीसारखा श्रेष्ठ नाटककारही काव्याच्या मोहाला बळी पडलेला दिसतो. मुरारी–जयदेवासारख्या नंतरच्या कवींच्या रचना तर 'दृश्य' न राहता केवळ 'श्रव्य' च राहतात.

शोकांतिकेचा अभाव हे संस्कृत नाट्यसृष्टीचे एक वैशिष्ट्यच म्हणावे लागेल. संस्कृत नाट्य प्रेक्षकांच्या मनाच्या 'विश्रांती'साठी तसेच मनोरंजनाद्वारा सदुपदेश साधण्यासाठी निर्माण झाले व उपयोगात आणले गेले. त्यामुळे नाटकाच्या नायकाने 'धीर' म्हणजे गुणी व आदर्श असावे, अनेक अडथळ्यांवर मात करून नाटकाच्या अखेरीस त्याने आपले उद्दिष्ट साध्य करावे, आणि 'रामादिवत् वर्तितव्यं,न रावणादिवत्' हा संदेश प्रेक्षकांच्या मनावर ठसवावा हा संस्कृत नाट्याचा साचाच ठरून गेला. दुष्ट शक्तींचा अंतिम विजय, नायकाचे अधःपतन व विनाश या शोकांतिकेला आवश्यक असलेल्या बाबी या साच्यात बसूच शकत नव्हत्या. त्यामुळे संस्कृत नाटकात पाश्चात्य ढंगाची शोकांतिका आढळत नाही. अर्थात भासाच्या ऊरूभंग आणि कर्णभार या दोनच एकांकिका या नियमाला अपवाद आहेत!

एवंगुणविशिष्ट संस्कृत नाट्य ही अभिजात संस्कृत वाङ्मयाची अतिशय महत्त्वाची आणि सर्वांगांनी बहरलेली शाखा आहे.

खालील प्रश्नांची उत्तरे वरील उताऱ्याच्या आधारे द्या.

i) 'नाट्यसंहिते' विषयी पुढीलपैकी काय योग्य आहे?

a) नाट्यसंहिता म्हणजे नाट्यप्रयोग

b) नाट्यसंहितेत वाङ्मयीन गुणवत्ता नसते.

ह्न c) नाट्यसंहिता प्रयोगशील असली पाहिजे.

d) संहितेत 'नाट्य' निर्मितीसाठी पांडित्यप्रचुर भाषा आवश्यक आहे.

ii) नाटकातील उत्तम दर्जाच्या पात्रांविषयी पुढीलपैकी कोणते विधान योग्य आहे?

a) उत्तम दर्जाची पात्रे विष्कंभकात असतात.

b) उत्तम दर्जाची पात्रे संस्कृत भाषेतच बोलतात.

ह्न c) नाटकातील स्त्रीपात्रे उत्तमदर्जाची असतात.

d) उत्तम दर्जाची पात्रे कथानकाचे धागे जुळवणारे निवेदन करतात.

iii) महाकवी कालिदासांच्या लेखनाची वैशिष्ट्ये कोणती?

iv) पुढीलपैकी कोणत्या प्रकारात 'नाटकाचा' समावेश होतो?

a) महाकाव्य

b) लघुकाव्य

ह्न c) नाट्य

d) ललित वाङ्मय

v) विष्कम्भक व प्रवेशकाचा हेतु काय?

3. पुढील उताऱ्याचा 1/3 सारांश लिहा. 10

नरेंद्र नास्तिक होता का?

इंग्रज या देशात आले. राज्यकर्ते झाले. अनेक नवनव्या देणग्या त्यांनी आपल्या काळ्या गुलामांना दिल्या. चहा व सोडा यापासून ते इंग्रजी शिक्षण व रेलगाड्यांपर्यंत. पण त्या सर्व खान-पान, नोकरी-धंदा आणि सोयी-सुविधा यांच्याशी संबंधित होत्या. शारीर होत्या. पण दोन बाबी अशा होत्या, की ज्यांनी भारतीयांचा कायापालट नव्हे, मनःपरिवर्तन करण्याचा कट रचला. त्या म्हणजे विज्ञानमूलक नास्तिकता आणि ख्रिस्ती धर्म यांचा प्रचार.

या दोन्ही गोष्टी एकमेकांना पूरक नव्हत्या. उलट, परस्परविरोधाची दोन टोकं होती ती. समस्त व्यक्ती व वस्तुमात्राला बाहुल्या बनवून नाचविणाऱ्या जगन्नियंत्याला विज्ञानाभिमुख व्यक्तीनं झुगारून लावावं, ही वैज्ञानिक हाकाटी करतानाच 'येशू एकटाच पापमुक्त करू शकतो' हे हाके ठोकून दरिद्रजनांना धर्मांतराची शिकार बनवणं अशा भयानक कारस्थानी योजना होत्या त्या.

भारतीयांना ती आकर्षणं नवलाईची वाटली. त्या षड्यंत्रांच्या बेशरम-वेली भारतभर फोफावल्या. सर्व शिक्षणसंस्था मिशनऱ्यांच्या हातात होत्या. त्यांनी अशी विषारी लस टोचली की प्रत्येक पिढीतले कुशाग्र बुद्धीचे विद्यार्थी नास्तिक झाले. नास्तिक होणं कमकुवतपणाचं लक्षण मुळीच नव्हतं. भरतभूमीत प्राचीन काळापासून दोन्ही प्रकारच्या नास्तिकांना – वेदधर्म न मानणारे आणि निखालस निरीश्वरवादी – समाजानं अव्हेरलं नव्हतं. चार्वाक, गौतम, महावीर आणि काही सांख्य वगैरे विचारकांना महामानव मानणाऱ्यांची संख्या थोडी थोडकी नव्हती. पण पाद्रीमंडळी कॉलेजकुमारांना फक्त नास्तिक करीत नसत; हिंदु धर्माचे घोर विरोधक घडवून त्यांना ख्रिस्ती धर्माच्या संमोहनाखाली आणीत असत. इंग्रजांच्या आगमनानं भारतीय आध्यात्मिक आणि सांस्कृतिक मूल्यांचा सत्यानाश होत होता. बंदूकधारी गोरी फौज भारतीयांना राजकीय गुलाम करीत होती आणि महनीय येशूच्या तथाकथित मिशनरी प्रतिनिधींचा फौजी हिंदुस्थानी मातीत शेकडो वर्षापासून रूजलेल्या, फुललेल्या सर्वसमावेशक संस्कृतीच्या फुलोऱ्यावर नांगर चालविण्यासाठी क्रॉसचा उपयोग करीत होती.

अध्यात्म–नाशक व संस्कृति–विध्वंसकांची ती फौज थोपवून धरली एका कृशकाय, भोळ्या–भाबड्या दिसणाऱ्या पण परमहंस असणाऱ्या पुजाऱ्यानं. त्यानं असा शिष्य निर्माण केला, ज्यानं साता समुद्रापलीकडं जाऊन विज्ञान, भोगवाद व धर्म यांचा अनर्थ करणाऱ्यांना त्यांचा सत्यार्थ सांगितला.

पण तो शिष्य किशोरवयात जेव्हा प्रथम आपल्या सद्‌गूरूला भेटला तेव्हा कट्टर नास्तिक होता.

नरेन व रामकृष्ण यांच्या पहिल्या भेटीनंतर महिन्याभरानं नरेश एकटाच, पायी पायी चालत दक्षिणेश्वरला गेला. अदमासे 1882 चा जानेवारी महिना असावा तो.

दुसरी भेट गुरू–शिष्यांत दक्षिणश्वरी झाली. त्या दुसऱ्या भेटीचं विवेकानंदांनी अत्यंत विस्तारपूर्वक वर्णन केलंय. त्यातील मुख्य अंश पाहू याः '' मी सरळ त्यांच्या खोलीत शिरलो. ते एकटेच होते, एका तक्तावर बसून होते. मला पाहून प्रसन्न झाले. आपल्यापाशी बसवून घेतलं. मी खाटेजवळ जमिनीवर बसलो. भावमग्न अवस्थेत विभोर, स्वतःशीच काही पुटपुटत ते हळूहळू माझ्याकडे सरकताहेत हे मी पाहिल. हा वेडा पुन्हा काहीतरी पागलपणा करणार, असा विचार माझ्या मनात डोकावत असतानाच त्यांनी आपला उजवा पाय माझ्यावर ठेवला. त्या स्पर्शानं क्षणभरात एक विचित्र अनुभूती मला झाली. भिंतींसकट खोलीतल्या सर्व वस्तू आणि माझं मन, अहंकार सारं काही वितळून कुठंतरी विलीन होऊ लागलं. अहंभाव नष्ट होणं म्हणजे मृत्यू आणि तो पुढ्यात आलेला पाहून मी चीत्कारलो, अहो, हे काय करताय तुम्ही? माझे आई–वडील आहेत ना!

''तो वेडा खळखळून हसू लागला. माझा हात धरून त्यानं माझ्या छातीला स्पर्श करीत सांगितलं, बरं तर तूर्तास राहू दे. एकदमच सर्व काही होणं आवश्यक नाहीये! वेळ आली की होईलच!''

''त्याच्या स्पर्शानं माझ्या डोळ्यांपुढील अद्‌भुत दृश्य लुप्त झालं.''

विवेकानंद पुढं सांगतात, ''हे सारं सांगायला किती तरी वेळ लागला, पण ते घडलं क्षणभरातच. स्तब्ध होऊन मी विचार करू लागलो, की हे काय गौडबंगाल? कोण हा अद्‌भुत पुरुष? त्याचा माझ्यावर असा काय प्रभाव की एक 'भाव' माझ्यात अचानक उद्‌भवतो अन् अदृश्यही होतो! ग्रंथांमधून मोहिनी इच्छाशक्ती संचरण आणि संमोहन– विद्या यांवर वाचलं होतं. पण दुबळ्या व कमकुवत मनाच्या माणसांवरच त्या प्रभावी होतात. हे सुद्धा वाचण्यात आलं होतं. पण मी तर प्रबळ इच्छाशक्ती असलेला तरूण! स्वतःला विशेष बुद्धिमान आणि मानसिक शक्तिसंपन्न असा मानत आलोय. असाधारण गुणी व्यक्तींवर साधारण जीव मोहित होतात, त्यांच्या हातची खेळणी बनतात; पण मी? मी तर प्रथमदर्शनीच याला अर्धवेडा मानलं होतं, तर मग माझ्या प्रखर मानसिकतेचा बळकट दोर या अवलियांन लीलया कसा हाताळला? पण याला पागल म्हणता येईल का? यापुढं सावध राहायला हवं. याच्या वशीकरण विद्येला यापुढे कधीही बळी न पडण्याचा मी दृढ संकल्प केला.''

4. a) पुढीलपैकी पाच म्हणींचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. 5

i) आयत्या बिळात नागोबा

ii) घोडी मेली ओझ्याने शिंगरू मेले हेलपाट्याने

iii) हलवायाच्या घरावर तुळशीपत्र

iv) रात्र थोडी सोंगे फार

v) डोळ्यात केर कानात फुंकर

vi) अगं अगं म्हशी मला कुठे नेशी?

vii) पळसाला पाने तीनच

b) पुढीलपैकी पाच वाक्‌प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. 5

i) पाय ओढणे

ii) कान फुंकणे

iii) हातावर तुरी देणे

iv) बोटावर नाचवणे

v) खांदे उडवणे

vi) नाकी नऊ येणे

English Paper

Marks : 40

1. Write an essay on any of the following topics in about 250 words. 10

   i) Caste in politics

   ii) India of my dreams

   iii) "Our future depends on agriculture"

2. Answer the questions below based on following passage 10

Man and woman are both equal and both plays a vital role in the creation and development of their families in a particular and the society in general. Indeed, the struggle for legal equality has been one of the major concerns of the women's movement all over the world. In India, since long back, women were considered as an oppressed section of the society and they were neglected for centuries. During the national struggle for independence, Gandhi gave a call of emancipation of women. He wrote-:I am uncompromising in the matter of women's rights. The difference in sex and physical form denotes no difference in status. Women is the complement of man, and not inferior". Thus, the first task in post-independent India was to provide a constitution to the people, which would not make any distinctions on the basis of sex. The preamble of constitution promises to secure to all its citizens- "Justice-economical, social and political".

The constitution declares that the equality before the law an the equal protection of laws shall be available for all. Similarly, there shall be no discrimination against any citizen on the ground of sex. Article 15(1) guarantees equalities of opportunities for all citizens in matters of employment. Article 15(3) provides that state can make any special provisions for women and children. Besides, directive principle of state policy which concern women directly and have a special bearing on their status directly and have a special bearing on their status include Article 39(a) right to an adequate means to livelihood;(d) equal pay for equal work both men and women, (e) protection of health and streght of workers-men, women, children and Article 42 provides for just and humane conditions of work and maternity relief.

It is really important to note that thought the constitution of India is working since more than fifty-seven years-the raising of the status of women to one of equality, freedom and dignity is still a question mark.

In India, since independence, a number of laws have been enacted in order to provide protection to women. For instance the Dowry prohibition Act 1961. The Equal Remuneration Act 1986. The Hindu Marriage Act 1956 , The Hindu Succession Act 1956, The Muslim Women (Protection of Rights on Divorce) Act 1987 , Protection of the women from Domestic Violence Act 2005, etc. But the laws have hardly implemented in their letter and spirit.

The sense of insecurity, humiliation and helplessness always keep a women mum. Our whole socialization is such that for any unsuccessful marriage which results in such violence or divorce, it is always the woman, who is held responsible. Cultural beliefs and traditions that discriminate against women may be officially discredited but they continue to flourish at the grass root levels. Family relations in India are governed by personal laws. The four major religious communities are Hindu, Muslim, Divorce, succession, adoption, guardianship and maintenance. In the laws of all the communities, women have fewer rights than that of man in corresponding situations. It is really that women of the minority communities in India continue to have unequal legal rights and even the women of the majority community have yet to gain complete formal equality in all aspects of family life. This is basically the problem of gender inequality. But what is this problem and how this can be solved.

i) What does the author say about relation between men and women?

ii) What was Gandhijis view on women's rights?

iii) What are the constitutional provisions regarding welfare of women?

iv) What are the various laws enacted in India for provision of protection to women?

v) Give a suitable title to the passage.

3. Summarise the given passage to 1/3rd of the given passage. 8

The most important issue at the heart of a right approach to early marriage is that of consent. The picture is similar to that concerning minimum age: in the vast majority of countries the law grants women the right to consent. Only in Cameroon, Jordan, Morocco, Uganda and Yemen are women specifically not granted by law the right to 'full, free and informed consent' to their marriage. But in a large number of countries, these legal provisions are merely symbolic.

The more important practical issue is, therefore, whether or not the idea of consent is socially rated. Difficult questions arise around the age a child should be before he or she can 'consent' as a mature, cognizant and independent being to sexual relations or marriage, but where no clear consent has been given by one or other partner, the marriage is clearly forced. In the case of marriages under the age of 10, consent-other than to dress up and play a game - is not a consideration. Toddlers married at Akha Teej ceremonies in Rajasthan cannot 'consent'. Nor is consent given in the cases of young girls from very poor homes in the Indian city of Hyderabad, Andhra Pradesh, sold as wives to rich men in the Middle East. Similarly, in marriages at or around puberty - from roughly ages 10 to 14 - 'consent' cannot be said to have been given since, at such an early age, a child cannot be expected to understand the implication of accepting a lifetime partner.

The question of marital consent becomes more difficult at age 15 or 16, by which stage a girl may have reached the legal age of sexual consent. In the CEDAW Committee's recommendation that the minimum age for marriage of both men and women should be 18,

it commented that, "When men and women marry, they assume important responsibilities. Consequently, marriage should not be permitted before they have attained full maturity and capacity to act". Many international bodies consider early marriage to be one of the "traditional practices prejudicial to the health of children" cited in article 24(3) of the Convention on the Rights of the Child. Furthermore, while in many countries a girl or boy may have reached the legal age of sexual consent at the age of 15 or 16, this should not be taken to mean that they are ready to enter marriage. A lact of legislative clarity over the different implications of consent of sexual activity and consent to marriage can result in strange anomalies.

4. Write a letters to the editor of a leading newspaper expressing your views on economic policies of present government. 7

5. Do as directed: 5

i) "What an awesome weather it is"? Ram said to Ashish (Change into indirect speech).

ii) Administrators has ordered people to vacate the place. (Identify and correct the error, if any).

iii) Complete the work quickly (Identify the adverb).

iv) Open the door (Add a question tag).

v) Give antonyms for:

a) Stationary

b) Strange

